# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य - ट्रायसेफ इनक्युबेशन सेंटर**

**CIN: U80301MH2022NPL383064** **EMAIL ID: ceotricef2023@gmail.com** **Contact No: 9404789254**

जा. क्र. गोवि/ट्रायसेफ/२०२४/२६४ दिनांक: १२.०६.२०२४

**परिपत्रक**

विषय: **"स्टार्टअप-थॉन" या आगामी होणाऱ्या राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये सहभागी होण्याकरीता नोंदणी करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्व शिक्षक, प्राचार्य, विद्यार्थी तसेच नवउद्योजक व संबंधितांना आवाहन करण्यात येते की, "स्टार्टअप-थॉन" ही उद्योजक आणि इनोव्हेटरर्सकरीता त्यांच्या कल्पना, कौशल्ये प्रदर्शित करण्याची आणि उद्योग तज्ञांकडून मौल्यवान आकर्षक बक्षिसांसाठी स्पर्धा करण्याची एक अनोखी संधी आहे. नवउद्योजकांमध्ये सर्जनशीलता, सहकार्य आणि उद्योजकतेला चालना देणे व त्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी योग्य व्यासपीठ प्रदान करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. सदर "स्टार्टअप-थॉन" राष्ट्रीय हॅकाथॉन ऑनलाईन पध्दतीने होणार आहे.

याअनुषंगाने सदर "स्टार्टअप-थॉन" या राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये नोंदणी करण्याकरीता अर्ज करण्याची अंतिम दिनांक १५ जुन, २०२४ रोजी असुन एका टिममध्ये कमीत कमी २ आणि जास्तीत जास्त ५ सदस्यांची नोंदणी करता येते तसेच नोंदणी शुल्क फक्त ९९/- रुपये आहे. सदर "स्टार्टअप-थॉन" या राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये नोंदणी करण्याकरीता https://uptoskills.com/start-up-thon/ या लिंकव्दारे अर्ज सादर करावे.

ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्षनास आणुन देण्यात यावी, ही नम्र विनंती.

12.06.24

**श्री. धिरजसिंग चंदेल**
मुख्य कार्यकारी अधिकारी, ट्रायसेफ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:**

१. मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. श्री. अमोल खोडवे, सिस्टिम ॲनालिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. यांनी सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावे.